Research Papers

# आदिवासी साहित्यातींल प्रवासवर्णनपर लेखन

**प्रा. डॉ. रमेश जाधवर**
शिक्षण महर्शी दादासाहेब लिमये महाविद्यालय
कळंबोली, नवी मुंबई

## प्रस्तावना :–

डॉ. गोविंद गारे यांनी काव्य, चरित्र, ऐतिहासिक, व्यक्तिचित्रण, लोकवाड्मय, बालवाड्मय, कला व संग्रहालयपर लेखनाबरोबर आदिवासी माणसांच्या वास्तव जीवनावर प्रवासवर्णनपर ही लेखन केले आहे. ' आदिवासी मुलखची भ्रमंती ' आणि ' आदिवासी लोकनृत्य लय, ताल आणि सूर' हे दोन ग्रंथ प्रवासवर्णनपर आहेत. डॉ. गोविंद गारे यांच्या कौन्हिनेन्टल प्रकाशनाने 2008 मध्ये आदिवासी लोकनृत्य, लय, ताल आणि सूर' हा ग्रंथ प्रकाशीत केला. त्यात त्यांनी महाराश्ट्रातील कोलाम, गोंड, कोरकु, भिल्ल, कोकणा, आंध, ठाकुर या आदिवासी जातीचे भ्रमंतीच्या काळात जीवन, संस्कृती, परंपरा आगदी जवळून पाहिलेल्या होत्या. आजच्या युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाने समाज जीवन सुखी आणि समृध्द करण्याचा प्रयत्न केला ओह. विज्ञाने उपलब्ध करून दिलेल्या साधनांचा सर्वदुर संचार झाला असून भारतीय संस्कृतीवर पाश्चात्य जीवनाचे संस्कृतीचे संस्कार फार वाढत चालले आहेत. पाश्चात्य जीवनाचे वाढते आकर्शण व अनुकरण जलद गतीने विस्तरत जाणारी नगरे व महानगरे औद्योगीकरण, सिनेमा, व्हिडीओ व दुरदर्शन यासारखी माध्यमे यामुळे भारताच्या सांस्कृतिक जीवनाला जबरदस्त हादरे बसत चालले आहेत.

आपल्या सभोवताली पसरलेल्यास जीवनातील लोककलेच्या व परंपरांचा शोध घेणे अवघड. तेथे दऱ्याखोऱ्यात हजारो वर्शापासून वास्तव्य करून असणाऱ्या आदिवासी माणसांच्या लोकसाहित्याचा अभ्यास करणे. त्याचे वास्तव पातळीवरील शोधून काढणे व त्याची नीट संगती लावणे अविश्रांत परिश्रम व निश्ठेशिवाय शक्य नाही. आदिवासी साहित्यात निश्ठेने काम करणाऱ्या अभ्यासकांपैकी डॉ. गोविंद गारे एक महत्वाचे नाव महाराश्ट्र आणि महाराश्ट्राबाहेर भ्रमण करून त्यांनी आदिवासींच्या संदर्भात प्रगाढ परिशीलन केले आहे. त्यांचे लेखन आदिवासी जीवनावर विपूल प्रमाणात असून मराठी साहित्य व मराठी लोकसाहित्यात मोलाची भर घालुन समृध्द करणारे आहे.

आदिवासी समाजाची लोककला म्हणून आपणाला लोककृत्याचा उल्लेख करावा लागेल. प्रत्येक आदिवासी समाजात जन्म, मृत्यू, उत्सव, सण याच्या निमित्ताने वेगवेगळया स्वरूपाची लोककृत्य निर्माण झालेली असतात. लोकनृत्यही आदिवासी माणसांच्या स्वंयपूर्ण प्रेरणेतून निर्माण झालेली असतात. स्वयंस्फुर्तपणे निर्माण झालेली लोकनृत्य आदिवासी समाजाच्या समाजजीवनाचे अविभाज्य अंग बनून जातात. निसर्गात उपलब्ध असणाऱ्या साधनापासून त्यांनी लोकनृत्याला आवश्यक असणारी साधने बनवलेली असतात. लोकनृत्याचा मूलभुत गुण म्हणजे उत्साह, आनंद, जोमदारपणा, ताल, लय आणि सुर यांचा सुरेख संगम साधलेला असतो. आदिवासी माणसांच्या जीवनात लोकनृत्य आणि गीतेही ताल, लय आणि नादाच्या माध्यमातून भूतलावरील आत्यंतिक आनंदाची प्रचिती घडवितात. आदिवासीची सर्वच नृत्य लोकनृत्य असतात. समाजातील लहानापासून वयोवृध्द माणसांनाही अवगत असणारी अशी कला आहे. त्यांची नृत्ये उत्साही व जोमदार आहेत. त्यांच्या नृत्यात तरपा, ढोल, यासारखी काही वाद्य असतात. त्यात ऐकणाऱ्याला आणि पहाणाऱ्याला गुंग करणारा मेळ असतो. ताल असतो आणि झोकाही असतो. 'करसाड' सारखी करून, दर्दभरी, 'करमा' सारखी तुरट चवीची गीतेही असतात. आदिवासी माणसांचा देव, दैवतावर जास्त प्रमाणात विश्वास आहे. म्हणून त्यांनी दैवतांनी प्रसन्न होऊन तातडीने यावे म्हणून म्हंटली जाणारी गीतेही रचलेली असतात. अलीकडे आदिवासी जीवनावर नागरी जीवनाचाही परीणाम झालेला आहे.

डॉ. गोविंद गारे आदिवासी समाजाच्या लोकनृत्याबरोबर आपल्या प्रवासवर्णात त्यांच्या दारिद्रयमय जीवनाचे वर्णन करतात. त्या संदर्भात म्हणतात. '' वारली राणचा राजा खरा पण तो आहे अठरा विश्वे दारिद्रयात अंगावर ना धड कपडा, राहण्याला ना धड झोपडी पोटाला ना पोटभर अन्न, कसाबसा जीवन जगतो आहे.'' सहयाद्रीच्या रांगात आजही वारली,ठाककर, कातकरी, महादेव कोळी, भिल्ल, मल्हार कोळी, गोंड यासारख्या अनेक आदिवासी जाती आणि जमाती राहत आहेत. या सर्व आदिवासी समाजाच्या घरात अज्ञान आणि दारिद्रय ठाण मांडून बसलेले आहे. आदिवासी लोक स्वतःला रानांचा वनांचा राजा मानतात. पण त्यांना आंग झाकण्याइतके कपडे सुध्दा नाहीत. पोटभर खायला अन्न नाही.

तरीही कश्टमय जीवन जगून आपल्या जीवनात आनंद मानण्याची त्यांची प्रवृत्ती आहे. निसर्गाच्या सान्निध्यात राहून स्वच्छंदी स्वरूपाचे मोकळे जीवन जगण्याची त्याला हाव आणि सवय आहे. या आदिवासी माणसांच्या वनसंस्कृतीने त्याला आनंद उपभोगण्याचा वारसा दिला आहे. आपल्या कश्टमय जीवनात नृत्य आणि संगीतातून मिळणारे काही सुखाचे क्षण हाच त्यांचा विरूंगळा त्यांच्या जीवनात सोबतीला व तालावरील नृत्याला विशिश्ट मनोरम व आगळा वेगळा भाव असतो. निसर्गाच्या सान्धियासत राहून निसर्गाप्रमाणे त्यांची वृत्तीही मनमोकळी आहे. डॉ. गोविंद गारे आदिवासी लोकनृत्याच्या संदर्भात म्हणतात. ''नागरी जीवनात नृत्याकडे पाहण्याची दृश्टी संपूर्ण वेगळी आहे. पण आदिवसी नृत्यांत बाप, मुलगा आणि नातू अशा तिन्ही पिढया अमाप उत्साहाने नाचत असताना आपल्याला दिसतात. इथे शगिर्दी करावी लागत नाही. गंडा बांधावा लागत नाही. किंवा पट बसवावा लागत नाही. समोर चाललेल्या नृत्याचा जोश, ताल लय याने प्रमुदित होऊन जाणते –अजाणतेपणे अंतःप्रेरणेने त्या जल्लोशांत सामील होणे एवढाच गुण आवश्यक असतो'' समाजामधील आदिवासी माणसांचे जीवन नृत्यमय आहे. समजामधील धार्मिक निरनिराळे विधी, सामाजिक समारंभ, पिकांच्या कापणीचा हंगाम अशाप्रसंगी निरनिराळया प्रकारची नृत्य केली जातात. त्यात बाप, मुलगा आणि नातू अशा तिन्ही पिढयातील लोक अमाप उत्साहाने भाग घेऊन नाचत असतात. जंगल, दऱ्यांखोऱ्यांतील जीवनात त्यांना करमणूक व मनोरंजन याचे कोणत्याही स्वरूपाचे साधन उपलब्ध नसल्याने स्वाभाविकय ते गाणी व नृत्यातून आनंद व्यक्त करीत असतात. या नाचगाण्यातून त्यांना अतिशय आनंद मिळतो. या प्रसंगी ते जंगलातील खडतर जीवन, कश्ट, तहानभुक सर्व काही विसरून जातात. आनंदाच्या भरात निसर्गाशी एकरूप होऊन बेभानपणे नाचतात.

स्हयाद्रीच्या पश्चिम उतारावरील गुजरात सरहद्दीलगतच्या प्रदेशात मोठया प्रमाणात वारली लोक राहतात. त्या वारली समाजाचया लोकनृत्याबरोबरच डॉ. गोविंद गारे आदिवासी माणसांना वास्तव्य प्राप्त झालेल्या भूमिचेही प्रवासवर्णनाच्या माध्यमातून अतिशय सुंदर शब्दात वर्णन करतात. ते पुढील प्रमाणे '' चोहोकडे हिरवीगार झाडी, वर निळे मोकळे आकाश व मधूनच खळखळणारा ओढा पाहून मन प्रसन्न होते. तेथे पावसाळा भरपूर पावसाचा चोहोकडे हिरवागार गालीचा पसरलेला असतो. उन्हाळयांत वनश्री पानाफुलांनी बहरलेली असते. उंच उंच ताडाची झाडे, त्यांच्याशीा स्पर्धा करणारी शिंदीच्या झाडांची काटेरी पाने, सावर, पांगाऱ्यांची लाल गर्द फुले, करवंदीच्या फुलांची पांढरीशुभ्र बने आणि आपल्या शेंदरी फुलांनी नटलेला पळस राजा हे सारे सृश्टिसौंदर्य खचित विलोभनीय आहे. हा रानराजीचा प्रदेश इथे रानचे राजे वारली राहतात.'' साहित्यिक गारे यांच्या या निसर्ग वर्णनात त्या मनमुराद आनंद लुटणाऱ्या आपले वेगळे विश्व निर्माण करणाऱ्या आदिवासी जीवनाच्या व्यथा आणि वेदना सहज येऊन जातात. कोणत्याही स्वरूपाचा मनात विद्रोह न धरता सहज स्वरूपात त्यांचे प्रवासवर्णन पुढे सरकत जाते. आपल्या या प्रवासवर्णनपर लेखनात ठाकुर, भिल्ल, गोंड, माडिया, कोलाम, कोरकू, भिल्ल या आदिवासी जमातीच्या नृत्याचा सुखद अनुभव त्यांनी रेखाटलेला आहे.

डॉ. गोविंद गारे यांच्या '' आदिवासी मुलखाची भ्रमंती'' या ग्रंथाची मराठी साहित्यामधील एक उत्कृश्ट प्रवासर्णन म्हणून नोंद घेतली आहे. या ग्रंथात त्यांनी अबुजमाड, भामरागड, बस्तर, डांग, नाशिकचा कोकणी परिसर, किनवट अंदर मावळ, डहाणू, तलासरी इत्यी आदिवासी परीसरातील प्रवास वर्णने आदिवसी लोकजीनाच्या अंगाने लिहिली आहेत. आदिवासी आणि त्यांचा प्रदेश त्यांचे जीवन आणि संस्कृती या विशयातील डॉ. गोविद गारे यांचा अधिकार सर्वज्ञात आहे. आदिवासी आणि आदिवासी प्रदेश हा त्यांच्या चिंतनाचा विशय आहे. ते एक व्यासंगी लेकख, संशोधक, विचारवंत आणि प्रतियश साहित्यिक आहेत. माडियांच्या भूमीत घनदाट झाडीत, एक संध्याकाळ माडियांच्या सहवासांत, घनदाट रानांत बस्तरच्या वनांत, खुली मने मोकळे हसू, दारिद्री नारायणाच्या माहेरघरी, अंदर मावळाच्या अंदरा खोऱ्यात, डोंगरीदेवाच्या डोंगरदारी, जवला खोऱ्याची तऱ्हाच निराळी, जेव्हा जंगलाला जाग येते. यासारख्या लेखातून त्यांनी आपले प्रवास वर्णन आदिवासींच्या विविध प्रश्नांच्या अनुशंगाने लिहिले आहे. ''माडियाच्या भुमीत घनदाट झाडीत'' या प्रवासवर्णनपर लेखाच्या सुरवातीलाच डॉ. गोविंद गारे म्हणतात. '' घनदाट जंगलातील दऱ्याखोऱ्यांतून उंच दाट अशा वृक्षराजीतून भटकण्याची व अगदी थरारक असे जीवन अनुभवण्याची विलक्षण ओढ लहानपणापसूनचा माझा जन्मच जंगल दऱ्याखोऱ्यामत झाला. त्यामुळे ते स्वाभाविकच होते.'' मुळातच जन्म आदिवासी समाजात झाल्यामुळे त्या जीवनाचे दाहक अनुभव त्यांनी लहानपणापासून घेतले होते. पुढे आपल्या जीवनात आदिवासी चिंतन हा विशय डोळयासमोर ठेवून निमगिरीपासून सहयाद्रीच्या दऱ्याखोऱ्यात विविध ठिकाणी वास्तव्यासस असलेल्या आदिवासी समाजाचे जीवन कोणत्या स्वरूपाचे आहे. याची प्रत्यक्ष परिस्थिती होण्यासाठी त्यांनी आदिवासी भागात भ्रमंतीचा मार्ग स्विकारलेला दिसतो. असाच एक दिवस चंद्रपूर जिल्हयातील घनदाट जंगलात जावून स्वच्छंद मुशाफिरी करून माडियांच्या जीवनातील विविध अनुभव त्यांनी रेखाटलेले आहेत. नागपुर ते चंद्रपुर शंभर मैलाच बसचा प्रवास करून चंद्रपुरपासून अहिरे पर्यंत सत्तर मैलांची परत भ्रमंती करून तेथून पंचेचाळीस मैलावर असणाऱ्या एटापल्ली बान्दे कॅम्पला भेट दिली. त्यावेळेस त्यांना खरे जंगली जीवन म्हणतात याची आठवण झाली. अशा या वेगळया जंगली वातावरणात मीडीया कसे जीवन जगत असावेत याची त्यांच्या मनाला उत्सुकता लागली होती. या जंगलात माडीया कसे जीवन जगत असावेत याची त्यांच्या मनाला उत्सुकता लागली होती. या जंगलात माडिया समाजातील माणसेही वाघाला घाबरत नाहीत दिवसाढवळया येथे वाघ येत असतो. दरवाजे उघडे ठेवून तेथे माणसे राहतात. पण त्यांना वाघाची भिती वाटत नाही. पण ही माणसे त्यांच्या समाजातील भगताला घाबरतात. मंत्रतंत्र जादुटोणा चेटकिण यावर त्यांचा विश्वास आहे. माडिया जमातीचे लोक वर्णाने काळे आहेत. अंगापिंडाने मजबूत बांध्याचे आहेत. अगोदरच काळे आणि त्यात पुन्हा दिवसभर उन्हातान्हातून उघडेनागडे फिरणारे असल्यामुळे त्यांच्या उपजत काळेपणात अधिकच भर पडत जाते. त्याचे चालणे कायमच आणवणी त्यांचा पोशाख म्हणजे पुरूशांच्या अंगावर फक्त वीतभर लंगोटी कमरेखालचा भाग जेमतेम झाकता येईल एवढच वस्त्र. त्या समाजातील बायका थोडेफार वस्त्र कमरेभोवती गुंडाळतात. छाती उघडीच पण त्याचा त्यांना संकोच वाटत नाही. अपरिचित माणसासमोरही त्या निःसंकोचपणे वावरत होत्या. त्यांया जीवनाचा सर्व कारभार अगदी मनमोकळेपणाने चाललेला असतो. गोटूलच्या माध्यमातून मुलांना किंवा मुलींना आपले जीवनाचे जोडीदार निवडण्याचे आणि बदलण्याचेही मुक्त स्वातंत्र्य त्यांनी दिलेले असते. अशा रितीने त्यांनी आदिवासी समाजातील वास्तवतेचे चित्रण आपल्या प्रवासवर्णनपर लेखातून केले आहे

संदर्भ ग्रंथ :–


| अ. नं. | लेखकाचे नाव | कलाकृतीचे नाव | प्रकाशन | आवृत्ती |
|---|---|---|---|---|
| १. | डॉ. गोविद गारे | ''आदिवासी लोकनृत्य, लय, ताल, व सूर'' | कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजयनगर पुणे ३० | २००४ |
| २. | डॉ. गोविंद गारे | '' आदिवासी मुलखाची भ्रमंती'' | आदिवासी विकास प्रति ठान धनकवडी. पुणे. | १२ जून २००४ |